**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# एक हजार विद्यार्थ्यांची मानवी साखळी

## पाटणला मतदान जागृतीसाठी उपक्रम; टक्केवारी वाढविण्यासाठी शपथ

**पाटण, ता. १४ :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाटण विधानसभा मतदारसंघाचे स्वीप पथक व प्रशासनाच्या वतीने येथील बाळासाहेब देसाई कॉलेज पटांगणावर तब्बल एक हजार विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून भारताचा भव्य नकाशा साकारत मतदान जागृती केली.

मानवी साखळीसाठी शहर व परिसरातील विविध विद्यालय तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक तसेच प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालुक्यातील कला शिक्षकांनी या नकाशाचे रेखाटन केले होते.

यावरूनच आज तब्बल एक हजार विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करत हा भारताचा भव्य नकाशा साकारला.




**पाटण :** बाळासाहेब देसाई महाविद्यालयात मानवी साखळीतून साकारलेला भारताचा नकाशा.

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुनील गाढे, तहसीलदार अनंत गुरव, गटविकास अधिकारी गोरख शेलार, नायब तहसीलदार श्रीकांत शेंडे, तालुका कृषी अधिकारी राजाराम लोखंडे, तालुका स्वीप पथक प्रमुख राजेश्री बने, सहायक पथक प्रमुख अरुंधती गरुड, नगरपंचायत नोडल अधिकारी श्रेयस ढगे, गजानन जाधव, वैष्णवी पवार, नागनाथ केंगार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते आकाशात मतदार जागृतीचा संदेश देणारे फुगे सोडून करण्यात आली. शेख यांनी सर्व उपस्थितांना मतदार प्रतिज्ञा दिली. मस्करवाडी धामणीच्या शिक्षिका रेखा कसबे तसेच विद्यार्थिनी दिव्यांका कसबे यांनी मतदार गीत सादर केले. जनजागृतीसाठी प्रभात फेरी करण्यात आली.

बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण येथील विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो हे पथनाट्य सादर केले. स्वीप सहायक पथक प्रमुख अरुंधती गरुड यांनी प्रास्ताविक केले. नितीन घाडगे यांनी आभार मानले.